| MHKO100010882022 | दाखल तारीख - ०२/११/२०२२<br>नोंदणी तारीख – ०२/११/२०२२<br>निकाल तारीख – १५/११/२०२४<br>कालावधी - वर्षे - महिने - दिवस<br>०२ - ०० - १३ |
|---|---|

**गडहिंग्लज येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात,**
**न्यायालय क्रमांक २, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर**
**पिठासीन अधिकारी डी. एम. पवार**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३६१/२०२२**
**निशाणी क्रमांक - १७/ब**

महाराष्ट्र सरकार तर्फे
नेसरी पोलिस स्टेशन
ता. गडहिंग्लज,
(गु.र.नं. ४६/२०२२) ... **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

गौस चॉदसो मुल्ला
वय ७२ वर्षे, धंदा शेती,
रा. सुंदरनगर, नेसरी,
तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर ... **आरोपी**

**दोषारोप – महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा.**

**विधिज्ञ -**

सौ. एन.डी.चव्हाण - सहा. सरकारी अभियोक्ता
श्री. व्ही.आर.नाईक - आरोपीतर्फे विधिज्ञ

## न्यायनिर्णय
## दिनांक १५/११/२०२४ रोजी जाहीर

१. आरोपी जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये दोषारोप संबंधीच्या संपरिक्षेस सामोरे जात आहे.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत -

२. अभियोगपक्षाचे कथनाप्रमाणे दिनांक २३/०८/२०२२ रोजी १०-४५ वाजताचे सुमारास नेसरी, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे एस.टी.स्टॅन्डजवळ श्री बेकरीच्या पाठीमागे आरोपी यांनी स्वतःचे फायद्याकरीता लोकांचेकडून पैसे घेवून त्यांना जुगार आकडयाच्या चिठ्ठया देवून कल्याण मटका नावाचा बेकायदा जुगार चालवित असताना रोख रुपये ४८५/- व जुगार साहित्यासह मिळून आला. त्याप्रमाणे शुभा प्रल्हाद भोसले महिला पोलिस शिपाई नेसरी पोलिस स्टेशन यांनी फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीप्रमाणे नेसरी पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. ४६/२०२१ नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा व जप्ती पंचनामा तयार केला व तपासाच्या अनुषंगाने साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले व सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपी यांचे विरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासन अधिकारी यांनी निशाणी ७ वर आरोपीविरुध्द वर नमुद गुन्हयाकरीता दोषारोप निश्चित केला. आरोपीने गुन्हा मान्य नसल्याचे सांगुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपी यांचे विरुध्द गुन्हादर्शक पुरावा आलेने फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३ (१)(ब) अन्वयेचे बयाण निशाणी क्र. १६ येथे नोंदविण्यात आले.

**५.** प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थितीत होतात. सदर वादप्रश्नावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक २३/०८/२०२२ रोजी १०-४५ वाजताचे सुमारास नेसरी, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथे एस.टी.स्टॅन्डजवळ श्री बेकरीच्या पाठीमागे आरोपी यांनी स्वतःचे फायद्याकरीता लोकांचेकडून पैसे घेवून त्यांना जुगार आकडयाच्या चिठ्ठया देवून कल्याण मटका नावाचा बेकायदा जुगार चालवित असताना रोख रुपये ४८५/- व जुगार साहित्यासह मिळून आल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय? | नाही |
| २ | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते |

## <u>कारणमिमांसा</u>

**मुद्दा क्रमांक १ बाबत -**

**६.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ धोंडीबा भैरु नाईक व साक्षीदार क्र. ३ भिकाजी शिवाप्पा पाटील हे जप्ती व घटनास्थळाच्या पंचनाम्यावरील पंच साक्षीदार आहेत. सदरच्या साक्षीदारांनी अभियोगपक्षाचे कथनास पृष्टी दिलेली नाही. अभियोगपक्षाने त्यांना उलटतपासाच्या स्वरुपामध्ये प्रश्न विचारले असता

त्यांच्या कोणतीही महत्त्वाची कबुली मिळविण्यात त्यांना यश प्राप्त झालेले नाही. सबब सदर साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षास निरुपयोगी ठरते.

७. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ शुभा प्रल्हाद भोसले या फिर्यादी आहेत. त्यांनी आपल्या सरतपासात दिनांक २३/०८/२०२२ रोजी पोलिस ठाणे येथे हजर असताना, स.पो.नि. प्रशांत पाटील यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की नेसरी गावी एस.टी. स्टॅन्डवर श्री बेकरीच्या पाठीमागे एक इसम जुगार चालवित आहे. वरिष्ठाच्या आदेशाने ते, त्यांच्या सहका-यासोबत छापा टाकणेसाठी दोन पंचासोबत बातमी मिळाल्या ठिकाणी गेले असता त्या ठिकाणी दुपारी १२.०० वाजता आरोपी कल्याण मटका घेत असताना मिळून आला. आरोपीस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव गौस चॉदसो मुल्ला असे सांगितले. आरोपीच्या ताब्यातून रोख रक्कम रुपये ४८५/-, एक बॉलपेन व कल्याण मटका आकडयाच्या चिठ्ठया मिळून आल्या. ए.एस.आय. पताडे यांनी सर्व मुद्देमाल जागीच पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त केल्या. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनला येवून आरोपी विरुध्द निशाणी क्र. १ प्रमाणे फिर्याद दिल्याचे कथन केले आहे. परंतु उलटतपासात ज्या खाजगी वाहनाने छापा टाकला त्या वाहनाचा क्रमांक सांगता येणार नाही, छापा टाकलेल्या ठिकाणाचा मिळकत क्रमांक/गट क्रमांक सांगता येणार नाही, छापा टाकलेल्या नोटांचा तपशिल सांगता येणार नाही, सापडलेल्या कोणत्या चिठ्ठयावर कोणता आकडा होता हे सांगता येणार नाही, पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता पूर्ण झाला हे सांगता येणार नाही असे सांगितले आहे.

८. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र. १ व ३ यांनी अभियोगपक्षाच्या

कथनास पृष्ठी केलेली नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ हे फिर्यादी व पोलिस कर्मचारी आहेत. सदर साक्षीदाराच्या पुराव्यात ज्या खाजगी वाहनाने छापा टाकला त्या वाहनाचा क्रमांक सांगता येत नाही, छापा टाकलेल्या ठिकाणाचा मिळकत क्रमांक/गट क्रमांक सांगता येणार नाही, छापा टाकलेल्या नोटांचा तपशिल सांगता येणार नाही, सापडलेल्या कोणत्या चिठ्ठयावर कोणता आकडा होता हे सांगता येणार नाही, पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता पूर्ण झाला हे सांगता येणार नाही असे सांगितले आहे. सदर साक्षीदाराच्या कथनास इतर साक्षीदारांनी पृष्ठी दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्या पुराव्यावरुन फिर्यादीतील नमुद मजकुराप्रमाणे घटना घडली होती याबाबत संशय निर्माण होतो. अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत न केल्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच अभियोग पक्षास अनेक वेळा संधी देवूनही तपासी अंमलदार यांना तपासलेले नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून मुंबई जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त केली होती याबाबत शंका निर्माण होते. उपरोक्त विवेचनावरुन अभियोग पक्ष आरोपीविरुध्दचा महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) नुसार असलेला दोषारोप निःसंशयपणे सिध्द करु शकलेला नाही म्हणून सदर आरोपी हे या खटल्यातील गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. म्हणून मी, मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** -

**९.** जप्त मुद्देमाल रक्कम रुपये ४८५/- आरोपी व इतर कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे रोख रक्कम ४८५/- ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करणेबाबत आदेश करणे योग्य व संयुक्तीक होईल. तसेच जप्त मुद्देमाल कल्याण जुगाराचे साहित्य व बॉलपेन हे मुल्यहीन असल्यामुळे अपीलाचा कालावधी

संपल्यानंतर कायद्याप्रमाणे नष्ट करणे योग्य व संयुक्तीक होईल. म्हणून, मी मुद्दा क्र. २ करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२(अ) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीन कतबा व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमाल एकूण रोख रक्कम रुपये ४८५/- ही अपीलाचे कालावधी संपल्यानंतर सरकार जमा करणेत यावी.

४. जप्त मुद्देमाल कल्याण जुगाराचे साहित्य व बॉलपेन हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

५. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र द्यावेत.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील **रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता,** क्रिमीनल ॲप्लीकेशन नं. ३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस. टी) नं. ३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी व न्यायालयीन लिपीक यांनी याबाबतचे स्वतंत्र रजिस्टर ठेवून त्याबाबतच्या नोंदी संबंधित रजिस्टरमध्ये घेणेत याव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.11.16 11:25:48 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक – १५/११/२०२४.

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र. २),
गडहिंग्लज